RNI No. MAHBIL/2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ७, अंक २४] मंगळवार, मार्च १६, २०२१/फाल्गुन २५, शके १९४२ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ४५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**अल्पसंख्याक विकास विभाग**
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १६ मार्च, २०२१

**अधिसूचना**

**वक्फ अधिनियम, १९९५.**

क्रमांक वक्फ २०२०/प्र.क्र. ६९/कार्यासन.— ज्याअर्थी, वक्फ अधिनियम, १९९५ (१९९५ चा ४३ वा) च्या कलम ८३ च्या पोट-कलम (१) व (४) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा व यासंबंधी प्राप्त असलेल्या इतर सर्व शक्तींचा वापर करुन, महाराष्ट्र शासनाने, शासन अधिसूचना, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र.वक्फ २०१५/प्र.क्र.१४२/कार्यासन-४, दिनांक १ ऑगस्ट २०१७, अन्वये, एखाद्या वक्फ किंवा वक्फ मालमत्तेशी संबंधित विवाद, प्रश्न व इतर संबंधित बाबींचे निर्धारण करण्यासाठी, एखाद्या भाडेकरुचे निष्कासन किंवा अशा मालमत्ता संदर्भातील भाडेपट्टाकार व भाडेपट्टादार यांच्या अधिकारांचे व बंधनांचे (obligation) निर्धारण उक्त अधिनियमांतर्गत करण्यासाठी, संपूर्ण महाराष्ट्र राज्यावर अधिकारिता असलेले, महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबाद ची स्थापना केली आहे;

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने, शासन अधिसूचना, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र.वक्फ/२०२०/ प्र.क्र.६९/ कार्यासन-४, दिनांक ६ जुलै, २०२० अन्वये श्री. मोहम्मद रियाजोद्दीन हाफीजोद्दीन, जिल्हा न्यायाधिश-१ आणि अतिरिक्त सत्र न्यायाधिश, मालेगाव, जि. नाशिक यांची महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरणावर अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आलेली होती;

आणि ज्याअर्थी, श्री. मोहम्मद रियाजोद्दीन हाफीजोद्दीन यांची बदली होत असल्याने मा. मुंबई उच्च न्यायालयाने त्यांच्या जागी श्री. शब्बीर अहमद ए. रज्जाक औटी, जिल्हा न्यायाधिश-१ आणि अतिरिक्त सत्र न्यायाधिश, कराड, जि. सातारा यांच्या नावाची अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबाद म्हणून नियुक्ती करण्यासाठी शिफारस केली आहे;

त्याअर्थी, वक्फ अधिनियम, १९९५ (१९९५ चा ४३ वा) च्या कलम ८३ च्या उप कलम (४) मधील खंड (अ) आणि महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण (अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती व सेवाशर्ती), नियम २०१५ मधील नियम क्र.३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा व यासंबंधी प्राप्त असलेल्या इतर सर्व शक्तींचा वापर करुन महाराष्ट्र शासन याद्वारे श्री. शब्बीर अहमद ए. रज्जाक औटी यांची अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबाद म्हणून नियुक्ती करत आहे, आणि त्या उद्दिष्टाकरिता उक्त अधिसूचने मध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :-

उक्त अधिसूचनेसोबतच्या तक्त्यामध्ये अनुक्रमांक १ मध्ये रकाना क्रमांक २ “नाव” या शीर्षकाखाली “श्री. मोहम्मद रियाजोद्दीन हाफीजोद्दीन” या शब्दांऐवजी “श्री. शब्बीर अहमद ए. रज्जाक औटी” या शब्दांचा समावेश करण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**जयश्री मुखर्जी,**
शासनाच्या अपर मुख्य सचिव.

**MINORITIES DEVELOPMENT DEPARTMENT**
Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 16th March, 2021.

*NOTIFICATION*

WAQF ACT, 1995.

No. Waqf 2020/C.R .69/Desk-4.—Whereas, in exercise of the powers conferred by sub-sections *(1)* and *(4)* of section 83 of the Waqf Act, 1995 (43 of 1995) and of all other powers enabling it in that behalf; the Government of Maharashtra *vide* Government Notification, Minorities Development Department, No.Waqf-2015/C.R.142/Desk-4, dated the 1st August 2017 (hereinafter referred to as "the said Notification"), has constituted the Maharashtra State Waqf Tribunal at Aurangabad, for the determination of any dispute, question or other matter relating to a waqf or waqf property, eviction of a tenant or determination of rights and obligations of the lessor and the lessee of such property, under the said Act, having jurisdiction over whole of the State of Maharashtra;

And whereas the State of Maharashtra has, *vide* Government Notification, Minorities Development Department, No. Waqf/ 2020/C.R.69/Desk-4, dated the 6th July 2020, appointed Shri Mohammad Riyazoddin Hafizoddin, District Judge-I and Additional Sessions Judge, Malegaon, District Nashik, as a Chairman of the Maharashtra State Waqf Tribunal at Aurangabad;

And whereas the Hon'ble High Court of Judicature at Bombay has now recommended the name of Shri Shabbir Ahmed A. Razaque Auti, District Judge-I and Additional Sessions Judge, Karad, District Satara for appointment as a Chairman of the Maharashtra State Waqf Tribunal, Aurangabad in place of Shri Mohammad Riyazoddin Hafizoddin who is under order of transfer;

Now therefore, in exercise of the powers conferred by clause (a) of sub-section *(4)* of section 83 of the Waqf Act, 1995 (43 of 1995) read with rule 3 of the Mahatashtra State Waqf Tribunal (Appointment and Conditions of Service of Chairman and Members) Rules, 2015 and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby appoints Shri Shabbir Ahmed A. Razaque Auti, District Judge-I and Additional Sessions Judge, Karad, District Satara, as a Chairman of the Maharashtra State Waqf Tribunal, Aurangabad, and for that purpose amends the said Notification as follows :—

In Table appended to the said Notification, in Serial No.1, in column (2), under the heading "Name", for the words "Shri Mohammad Riyazoddin Hafizoddin" the words "Shri Shabbir Ahmed A. Razaque Auti" shall be substituted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

JAYASHREE MUKHERJEE,
Additional Chief Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE